N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** रामानंद

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0219 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**10/06/2025 22:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 10/06/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/06/2025

**Time From (वेळेपासून):** 14:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/06/2025 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 044

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/06/2025 22:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एमजे कलेजच्या पाठीमागे,गिरणा टाकिजवळ,जळगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्यामसुंदर बालकिसन लाठी

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : बालकिसन लाठी

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जिवननगर,रामानंदनगर जवळ,जळगांव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जिवननगर,रामानंदनगर जवळ,जळगांव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8806662091

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भुषण शालिग्राम चौधरी | | वडील का नाम : शालिग्राम चौधरी | 1. प्लट नं,01फ्टॅटनं 02 वैशाली अ,अपार्टमेन्ट,लक्ष्मीनगर , एमजे,,कलेजच्या पाठीमागे जळगाव,,रामानंद,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000/ रूपये (त्यात 500 रू. दराच्या 10चलनी नोटा)अ.पा. लावलेल्या | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

रामानंदनगर पोस्टे भाग 6सीसीटिएनएस गुरनं. 219/2025 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन1988 चे कलम 7 प्रमाणे

फिर्यादी - श्यामसुंदर बालकिसन लाठी वय 46 वर्षे व्यवसाय.-खाजगी नोकरी,रा.जिवननगर,रामानंदनगर जवळ, जळगांव

आरोपी-भुषण शालिग्राम चौधरी वय-37 वर्षे,रा. प्लॉट नं,01फ्टॅटनं 02 वैशाली अपार्टमेन्ट,लक्ष्मीनगर ,एम.जे, कॉलेजच्या पाठीमागे जळगाव,(महावितरण विज विभाग)

अप.घ.ता.वे.व ठिकाण- दि.10/06/2025 रोजी 14.15 वाजेचे सुमारास एम.जे कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या गिरणा टाकिजवळ

लाचेची मागणी रक्कम-प्रथम 15,000/-रूपये, व तडजोडी अंती 5000/- रुपये

स्विकारली रक्कम-5000/- रूपये (त्यात 500 रू.दराच्या 10चलनी नोटा)अ.पा.लावलेल्या

सापळा व तपास अधिकारी- स्मिता नवघरे,पोलीस उपअधीक्षक अँन्टीकप्शन ब्युरो, जळगाव

खुलासा- यातील फिर्यादी हे त्यांचे मोठे भाऊ जितेंद्र लाठी यांचे नावे असलेल्या जीवन नगर मधील घरात रहावयास आहेत.सदरचे घर हे त्यानी श्री. एकनाथ लखोटे यांचे कडुन विकत घेतले असुन ते मयत झाल्याने सदर घराचे विज मिटर हे अद्याप पावेतो त्यांचेच नावावर आहे. महावितरण विज कंपनीकडुन जुने विज मिटर काढुन स्मार्ट मिटर बसवण्याचे काम सुरु आहे. त्याप्रमाणे दि.06/06/2025रोजी मयुर सुर्वे नामक ईसमाने तक्रारदार राहत असलेल्या घराचे जुने विज मिटर काढुन त्याऐवजी नविन विज मिटर बसवुन दिले होते. त्यानंतर आलोसे याने तक्रादार यांचे घरावरुन काढुन घेतलेले जुने विज मिटर पाहुन तक्रारदार यांना " तुमच्या मिटरचे सिल तुटलेले असुन मिटरला होल पाडुन, वायर तोडुन त्यामध्ये छेडछाड केल्याचे दिसत आहे. ते मिटर टेस्टींगला पाटवावे लागेल" असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी सदरचे जुने विज मिटर बसवुन देणारे वायरमन शाम पाटील यांना फोन करुन ,बोलावुन घेवुन जुने विज मिटर संदर्भात त्यांचे भाऊ दिपक लाठी यांचे सोबत फोनवर बोलणे करुन दिले होते तेव्हा त्यांनी तुम्ही समक्ष येवुन भेटा, फोनवर नाही सांगता येणार असे सागीतले होते.

त्यानंतर दि.07/06/2025 रोजी आलोसे याने तक्रादार यांचे मोठे भाऊ दिपक लाठी यांना फोन करुन काव्यरत्नावली चौकातील एच.डी.एफ.सी.बँकेसमोर असलेल्या रोडच्या पलीकडे भेटण्यासाठी बोलावले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांचे भाऊ दिपक लाठी यांनी तक्रारदार यांना फोन करुन सदर ठिकाणी बोलावुन घेतले होते. त्यानंतर तक्रारदार,त्यांचे भाऊ व आलोसे यांची भेट होवुन जुने विज मिटर संदर्भात चर्चा झाली .सदर चर्चे दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांना " तुम्ही जुने विज मिटर मध्ये छेडछाड करुन मिटर फॉल्टी केलेले आहे. तुमच्या विरुद्ध विज चोरीचा गुन्हा दाखल होईल किंवा तुम्हाला आर्थिक दंड भरावा लागु शकतो. त्याबाबत तुमच्यावर कारवाई होउ द्यायची नसेल तर तुम्हाला मला 15 हजार रुपये द्यावे लागतील " असे सांगुन लाच रक्कमेची मागणी केली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रादार यांना त्यांचे राहते घरुन काढुन घेतलेले जुने विज मिटर त्यांनी छेडछाड करुन ते फॉल्टी आहे असे भासवुन तक्रादार याचेवर विज चोरीचा गुन्ही किंवा अर्थिक दंड

भरण्याची कारवाई व करण्याचे मोबदल्यात 5 हजार रुपये लोचेची मागणी सदर लाच रक्कम आज दि. 10/06/2025 रोजी 14.15 वा.चे सुमारास एम.जे.कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या गिरणा टाकिजवळ तक्रादार यांचे कडुन पंचासमक्ष स्वतः स्विकारली म्हणुन गन्हा.सोबत टंकलिखीत केलेली फिर्याद जोडलेली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

rajendra pandharinath gunjal(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
रामानंद नगर पो.स्टे जळगाव

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): rajendra pandharina
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

# फिर्याद

रामानंद नगर पोलीस स्टेशन
दिनांक १०.०६.२०२५

**मी– शामसुंदर बालकिसन लाठी, वय ४६ वर्षे, व्यवसाय– खाजगी नोकरी, रा. जीवन नगर, रामानंद नगर जवळ, जळगाव. मो.नं.८८०६६६२०९१**

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी परिवारासह राहतो व सुप्रीम कंपनीत खाजगी नोकरी करतो. जीवन नगर मधील मी राहत असलेले घर हे माझे मोठे भाऊ जितेंद्र लाठी यांनी श्री.एकनाथ लखोटे यांचेकडुन विकत घेतले आहे. परंतु ते मयत झाल्याने सदर घराचे विज मिटर हे अद्याप पावेतो देखील पुर्वीचे घर मालक श्री.लखोटे यांचे नावावर आहे. दि.०६.०६.२०२५ रोजी २ जण माझे घरी आले. त्यापैकी एका इसमाने त्यांचे नाव मयुर सुर्वे असे सांगुन, महावितरण विज कंपनी कडुन जुने विज मिटर काढुन स्मार्ट मिटर बसवण्याचे काम सुरु असल्याचे सांगीतले. व माझे घरावरील जुने विज मिटर काढुन घेवुन त्याऐवजी किंबल कंपनीचे नविन विज मिटर बसवुन दिले. त्यानंतर मयुर सुर्वे यांना एका इसमाचा फोन आला. त्यानंतर तो ईसम माझे घरी आला. तेव्हा मला त्या ईसमाचे नाव भुषण चौधरी, कंत्राटी वायरमन असल्याचे समजले होते.

भुषण चौधरी, कंत्राटी वायरमन याने काढुन घेतलेले विज मिटर पाहुन मला ''तुमच्या मिटरचे सिल तुटलेले असुन मिटरला होल पाडुन, वायर तोडुन त्यामध्ये छेडछाड केल्याचे दिसत आहे. ते मिटर टेस्टींगला पाठवावे लागेल'' असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना सदरचे विज मिटर हे वायरमन शाम पाटील याने बसवुन दिले आहे असे सांगुन त्याला फोन करुन बोलावुन घेतले. तो सदर ठिकाणी आल्यानंतर आमचेत जुने विज मिटर बाबत बोलणे झाले. मी माझे मोठे भाऊ दिपक लाठी यांना फोन करुन घडलेल्या घटनेची माहिती देवुन त्यांचे व वायरमन शाम पाटील याचे माझे फोनवरुन बोलणे करुन दिले. तेव्हा शाम पाटील याने त्यांना तुम्ही समक्ष येवुन भेटा, फोनवर नाही सांगता येणार असे सांगीतले होते.

CCTNS
219/25

त्यानंतर दि.०७.०६.२०२५ रोजी वायरमन भुषण चौधरी याने मोठे भाऊ दिपक लाठी यांना फोन करुन काव्यरत्नावली चौकातील एच.डी.एफ.सी.बॅंकेसमोर असलेल्या रोडच्या पलीकडे भेटण्यासाठी बोलावले होते. त्याप्रमाणे भाऊ दिपक लाठी याने मला फोन करुन सदर ठिकाणी बोलावुन घेतले होते. त्यानंतर आम्हा दोघे भावांची वायरमन भुषण चौधरी यांची भेट घेतली असता त्याने **''मला तुम्ही जुने विज मिटर मध्ये छेडछाड करुन मिटर फॉल्टी केलेले आहे. तुमच्या विरुध्द विज चोरीचा गुन्हा दाखल होईल किंवा तुम्हाला आर्थीक दंड भरावा लागु शकतो. त्याबाबत तुमच्यावर कारवाई होउ द्यायची नसेल तर तुम्हाला मला १५ हजार रुपये द्यावे लागतील''** असे सांगुन लाचमागणी केले बाबत मी दि.१०.०६.२०२५ रोजी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक स्मिता नवघरे,लाचलुचपत प्रतिबंध विभाग जळगाव यांचेसमक्ष बहिणाबाई उद्यान जळगाव या ठिकाणी तक्रार लिहुन दिली होती.

पोलीस ठाणे अंमलदार
रामानंद नगर पो.स्टे.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी करण्यासाठी दि.१०.०६.२०२५ रोजी सापळा अधिकारी नवघरे मॅडम यांनी मला व पंच श्री.शिरसाठ यांना आवश्यक त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर चालु करून, ते माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन दिले. त्यानंतर मी वायरमन भुषण चौधरी यांना फोन केला. परंतु त्यांनी माझा फोन रिसीव्ह केला नाही. म्हणुन माझे भाऊ दिपक लाठी यांनी त्यास फोन केला असता त्याने फोन रिसीव्ह करुन आम्हाला एम.जे.कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या गिरणा टाकीजवळ भेटण्यासाठी बोलावले होते. त्याप्रमाणे सापळा अधिकारी नवघरे मॅडम यांनी मला व पंच क्र.१ शिरसाठ यांना माझे मोटर सायकलने तसेच माझे मोठे भाऊ दिपक लाठी यांना त्यांचे मोटर सायकलने वायरमन भुषण चौधरी यांना भेटण्यासाठी एम.जे.कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या गिरणा टाकीजवळ पाठवले होते. आम्ही सदर ठिकाणी गेला असता वायरमन भुषण चौधरी दिसले नाही. म्हणुन मोठे भाऊ दिपक लाठी यांनी त्यांना फोन केला असता त्यांनी आम्हाला गिरणा टाकीचे खाली आतमध्ये बोलावले. त्याप्रमाणे आम्ही सदर ठिकाणी जावुन त्यांची भेट घेतली. तेव्हा आमच्यात व त्यांच्यात काढुन घेतलेल्या

जुने विज मिटर बाबत चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान त्यांनी माझे राहते घरुन काढुन घेतलेले जुने विज मिटर फॉल्टी आहे असे भासवुन माझेवर कारवाई न करण्याचे मोबदल्यात ५ हजार रुपयांची लाच मागणी केली होती. तेव्हा मी त्यांना **"मला कुठला त्रास होणार नाही ना"** असे विचारले असता त्यांनी मला **"माझा नंबर आहे न तुमच्याकडे बिल वगैरे काही आल तर मी जिम्मेदार आहे"** असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना थोडया वेळात पैसे आणुन देतो असे सांगीतल्या नंतर आम्ही तेथुन निघुन आलो आहे.

सापळा अधिकारी नवघरे मॅडम यांचे सुचने प्रमाणे मी माझे घर खर्चातील ५,०००/—रूपये (त्यात ५०० रुपये दराच्या १० नोटा) सापळा पथकाकडे दिल्या. पंचासमक्ष सदर नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेण्यात आले. व सदर नोटांना अ‍ॅन्थ्रासिन पावडर लावुन, त्या माझे शर्टचे डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवुन देण्यात आल्या. वायरमन भुषण चौधरी यांनी मला लाच रक्कम घेवुन एम.जे.कॉलेजच्या पाठीमागील गिरणा टाकीजवळ बोलावले असल्याने सापळा अधिकारी नवघरे मॅडम यांनी सदर ठिकाणी सापळा लावण्याचा निर्णय घेतला.

सापळा अधिकारी नवघरे मॅडम यांनी मला व पंच श्री.शिरसाठ अशांना योग्य त्या सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून, माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन देवुन, मला व पंच क्र.१ शिरसाठ यांना माझे मोटर सायकलने तसेच माझे मोठे भाऊ दिपक लाठी यांना त्यांचे मोटर सायकलने वायरमन भुषण चौधरी यांना त्यांचे मागणी प्रमाणे ५ हजार रुपये लाच रक्कम देण्यासाठी एम.जे.कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या गिरणा टाकीजवळ पाठवले होते. सदर ठिकाणी वायरमन भुषण चौधरी व आमच्यात माझे राहते घरुन काढुन घेतलेल्या जुने विज मीटर बाबत चर्चा झाली. मी त्यांना **"कोण साहेब वगैरे असतील तर बोलण करुन घ्या, म्हणजे मला प्रॉब्लेम नको, तुम्हाला पण द्यावे लागतील, दुसऱ्याला पण द्यावे लागतील असे नको व्हायला"** असे म्हटले. तेव्हा त्यांनी **"मी बसलेला आहे, मला कधीही फोन लावा तुम्ही, सगळा विषय मी क्लियर करुन देईल, कोणशी बोलायची गरज नाही काही घाबरु नका"** असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांना माझे शर्टचे डाव्या बाजूच्या खिश्यातुन ५ हजार रुपये रक्कम काढुन त्यांचे समोर धरुन **"मोजुन घ्या"** असे म्हटले. त्यांनी सदरची लाच रक्कम माझेकडुन स्विकारुन त्यांचे हातात धरुन ठेवुन **"काही प्रॉब्लेम नाही"** असे सांगीतले. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे सापळा पथकास लाच रक्कम स्विकारले बाबत ईशारा केला व सापळा पथकाने वायरमन भुषण चौधरी यास जागीच लाच रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. तसा संपुर्ण सापळा कार्यवाहीचा पंचनामा करण्यात आला आहे. त्या दरम्यान मला कंत्राटी वायरमन भुषण चौधरी यांचे पुर्ण नाव भुषण शालिग्राम चौधरी, वय ३७ वर्षे, रा.प्लॉट नं.१, फ्लॅट नं.२, वैशाली अपार्टमेंट, लक्ष्मी नगर, एम.जे. कॉलेजच्या पाठीमागे जळगाव असे असल्याचे माहित झाले आहे.

तरी दि.०६.०६.२०२५ रोजी माझे राहते घरावरील काढुन घेतलेले जुने विज मिटर कंत्राटी वायरमन भुषण चौधरी यांनी पाहुन मला **"तुमच्या विज मिटरचे सिल तुटलेले असुन, मिटरला होल पाडुन, वायर तोडुन त्यामध्ये छेडछाड केल्याचे दिसत असुन, सदर विज मिटर टेस्टींगला पाठवावे लागेल"** आहे असे सांगीतले होते. त्यासंदर्भात मी व माझे मोठे भाऊ दिपक लाठी यांनी दि.०७.०६.२०२५ रोजी कंत्राटी वायरमन भुषण चौधरी यांची भेट घेतली असता **त्यांनी माझे राहते घरुन काढुन घेतलेले जुने विज मिटर फॉल्टी आहे असे भासवुन माझेवर विज चोरीचा गुन्हा किंवा आर्थीक दंड भरण्याची कारवाई न करण्याचे मोबदल्यात ५ हजार रुपये लाचेची मागणी** केली. व सदर लाच रक्कम आज १४.१५ वा.चे सुमारास एम.जे.कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या गिरणा टाकीजवळ स्वत: पंचासमक्ष माझेकडुन स्विकारली आहे म्हणुन माझी फिर्याद आहे.

**समक्ष**

**स्मिता नवघरे**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**जळगांव**

**ही फिर्याद दिली,**
**सही,दि.१०.०६.२०२५**

Shyamsunder B. Lathi